28 December 2012

॥ श्री ॥
- भक्तियोग -

अध्याय - १२ वा

लहानथोरांपासून सर्वांना अगदी सुपरिचित असणारा हा अध्याय! श्लोकसंख्या कमी असल्याने आणि इतर अध्यायांच्या तुलनेत शब्दोच्चारही सोपे असल्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी हा अध्याय बऱ्याचदा पाठांतरासाठी नेमला जातो. बऱ्याचजणांनी हा अध्याय मुखोद्गत केला आहे. त्यातील तत्त्व हे वरवर पहाता समजायला सोपे वाटते. परंतु सोपा आहे म्हणून कमी महत्त्वाचा मात्र समजू नका. अतिशय रसाळ आणि अर्थपूर्ण आहे हा भक्तियोग!

ह्या भक्तियोगाला भगवंतांनी स्वतः अमृताची धार असे म्हटले आहे. शेवटच्या श्लोकात 'धर्म्यामृत' म्हणजे हे धर्ममय अमृत असे गौरवले आहे. हा अध्याय अमृता-प्रमाणे मधुर तर आहेच पण संजीवक देखील आहे. या अध्यायात अर्जुनाचा एकच प्रश्न आहे व पुढील १९ श्लोकात भगवंतांनी भक्तिरसाचे माहात्म्य सांगितले आहे.

वास्तविक सहाव्या अध्यायापासून भक्तिरसाला आरंभ झाला आहे. अध्याय ६ ते ११ मध्ये एकाग्रतेपासून समग्रता सांगितली आहे. सहाव्या अध्यायात चित्ताची एकाग्रता कशी होईल? त्याची साधने कोणती? एकाग्रतेची आवश्यकता काय हे सांगितले आहे. आणि अकराव्या अध्यायात समग्रता सांगितली आहे. एकाग्रतेपासून समग्रतेकडे मजल कशी गाठली आहे हे पहाणे उद्बोधक ठरेल. एकदा का चित्ताची एकाग्रता साधली की कोणत्याही विषयाचा अभ्यास चांगला होऊ शकतो. उदा० गणित, विज्ञान. पण एकाग्रतेचे ते सर्वोत्तम साध्य नव्हे. म्हणून सातव्या अध्यायात ही एकाग्रता ईश्वरचरणी वळवली आहे. इंद्रिये सतत त्याच्या सान्निध्य

Notes

ID - 737-725-7624

VJEup

www.madhaveeraghuveer.com

8.00 असावीत. सर्व इंद्रियांना अभ्यास घडावा. 'पडिले वळण
इंद्रिया सकळा। भाव तो निराळा नाही दुजा।' अशी
9.00 स्थिती झाली पाहिजे. सर्व इंद्रियांना त्या ईश्वराचा ध्यास
लागावा. डोळ्यांना ते रूप सतत पहावेसे वाटावे. कानांना
10.00 ते हरिकीर्तन ऐकावे, जिव्हेने सतत नाम घ्यावे. सदा माझे
डोळा, पाहो तुझी मूर्ति। असे वाटावे. म्हणजेच एकाग्रता
11.00 ही ईश्वराभिमुख व्हावी. आठव्या अध्यायात याच एकाग्रतेचे
सातत्य सांगितले आहे. सतत मुखात नाम असेल तरच
12.00 अंतकाळी देखील नाम घेता येईल. नवव्या अध्यायात
समर्पणता शिकवली आहे. जे जे भक्तिभावाने अर्पण
1.00 कराल त्या सर्वांचा भगवंत स्वीकार करेल. जे जे कर्म
आपण करू, ते ते सर्व भगवंतालाच अर्पण करावे.

2.00 दहाव्या अध्यायात क्रमिकता सांगितली आहे.
मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व गोष्टींमध्ये भगवंत ओतप्रोत
3.00 भरला आहे. हे जरी खरे असले तरी तो हळूहळू पचनी
पडावा लागतो. यासाठी सृष्टीतील काही ठळक उदाहरणे
4.00 देऊन त्या सर्वव्यापी परमेश्वराची ओळख करून दिली
आहे. त्यानंतर अकराव्या अध्यायात तर समग्रता
5.00 सांगितली आहे. त्यात भगवंतांनी विश्वरूप दर्शन
घडविले आहे. एखाद्या लहानशा धुळीच्या कणातही
6.00 संबंध विश्व भरले आहे हा अनुभव घेणे म्हणजेच
'विराट दर्शन' होय. अशी ही सहाव्या अध्यायापासून
7.00 अकराव्या अध्यायापर्यंत भक्तीरसाची निरनिराळ्या
प्रकाराने केलेली छाननी आहे.

*Notes*

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

आता बाराव्या अध्यायात भक्तिरसाचा समारोप करायचा आहे. त्यावेळी अर्जुन प्रश्न विचारतो —

काही सगुणाचे भजन करतात तर काहीजण निर्गुणाची उपासना करतात तर या दोहोंपैकी कोणता भक्त तुला अधिक प्रिय आहे?

ह्या प्रश्नाचे नेमके उत्तर देणे अवघड आहे. एखाद्या आईला तिच्या दोन मुलातला जास्त लाडका कोण असे विचारण्यासारखे आहे. ज्ञानमार्गी हा मोठ्या भावासारखा समंजस तर भक्तीमार्गी हा लहान मुलासारखा सतत आईजवळ रहाणारा आहे. आईने काहीही उत्तर दिले तरी ते पूर्णपणे खरे नक्कीच नाही. तशीच धांदल भगवंताची झाली आहे.

सगुण - सतत ईश्वराचे स्मरण करणारा, अर्चन, पूजन करणारा आहे. तर

निर्गुण - इंद्रियनिग्रह करणारा. सर्वभूतहितामध्ये मग्न असल्यामुळे ईश्वराचे स्मरणही न करणारा आहे.

या दोन्हीत प्रिय कोण? दोन्ही भक्त खरं तर समान योग्यतेचे आहेत. त्यांची तुलना कशी करणार? ते आतून एकरूपच आहेत. दोघेही परमेश्वराचे लाडके आहेत. पण सगुणभक्ती जास्त सुलभ, सुरक्षित आहे. सगुण उपासकासाठी इंद्रिये ही साधनरूप आहेत. तो डोळ्यांनी हरिरूप पहातो, कानांनी हरिकथा ऐकतो. जिभेने नाम उच्चारतो, हाताने सेवा करतो. पायाने यात्रा करतो. त्याची इंद्रिये भोगासाठी नाही तर सेवेसाठी असतात.

*Notes*

SUNDAY 19

ऐसे श्रवण सगुणाचे । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचे ।
विभक्ती सांडून भक्तीचे । मूळ शोधावे ॥ ४-९,33

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

8.00 त्याउलट निर्गुण उपासकाला इंद्रिये विघ्नरूप वाटतात.
तो इंद्रियांचा आहार तोडतो. त्यांच्यावर पहारा ठेवतो.
9.00 इंद्रियदमनाचेच दोन्ही प्रकार आहेत.

त्याचप्रमाणे ज्ञानाने मनाचे स्थूल मळ जरी
10.00 जळून खाक होत असले तरी सूक्ष्म मळ धुवून
टाकण्याचे सामर्थ्य त्यात नाही. ती शक्ती भक्तीच्या
11.00 पाण्यात आहे. याचा अर्थ ज्ञानाचा दर्जा कमी आहे
असे नाही. शुद्ध ज्ञानामुळे चित्तातले मळ धुतले जातात.
12.00 पण देहाभिमानी पुरुषाला असे शुद्ध ज्ञान होणेही
कठीण आहे. त्यापेक्षा सगुण भक्ती सोपी आहे. पण
1.00 तिथेदेखील सगुणातून निर्गुणाकडे जाता यायला हवे.

एखादी व्यक्ती संस्था स्थापन करते. ती व्यक्तीच
2.00 त्या संस्थेचा प्रमुख आधार असते. पण जसा संस्थेचा
विकास होत जातो तसतशी ती संस्था व्यक्तिनिष्ठ
3.00 न रहाता तत्वनिष्ठ झाली पाहिजे. नाहीतर मग ती
व्यक्ती लोपताच अंदाधुंदी माजेल. म्हणून सगुणाला
4.00 निर्गुणाची मदत घ्यावी लागते. प्रथम स्फूर्तीचा झरा
सगुणातून निर्माण झाला तरी शेवटी परिपूर्णता
5.00 तत्वनिष्ठ - निर्गुणातच व्हायला हवी. भक्तीच्या
वेलीला ज्ञानाची फुले लागावीत. प्रथम व्यक्ती नंतर
6.00 संघ आणि त्यानंतर सिद्धांत असा क्रम हवा —

बुद्धं शरणं गच्छामि ।
7.00 संघं शरणं गच्छामि ।
धर्मं शरणं गच्छामि ॥

www.madhaveeraghuveer.com

Notes

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

मूर्तिपूजा जोवर निर्गुणाच्या चौकटीत असते तोवर ती निर्दोष असते. सगुणाची उपासना करता करता निर्गुणाचे अनुसंधान असावे. थोडक्यात सगुण आणि निर्गुण दोन्ही परस्परपूरक आहेत.

रामायणातील अयोध्याकांडातील उदाहरण - लक्ष्मण - सगुणभक्ती - एखाद्या ध्वजदंडाप्रमाणे स्थिर उभा राहून त्याने रामाच्या यशाची ध्वजा फडकत ठेवली. तो रामाची छाया होता. अनेक अवघड कामे त्याने केली. नदी ज्याप्रमाणे समुद्राला मिळावी त्याप्रमाणे लक्ष्मणाची सेवा रामात मिसळून गेली होती. रामाचे हात, रामाचे डोळे, रामाचे मन लक्ष्मणच झाला होता. त्याला स्वतःचे अस्तित्व उरले नव्हते. ही झाली सगुण भक्ती तर भरताने रामाची केलेली भक्ती ही निर्गुणभक्ती. भरताने रामापासून दूर राहून राज्यकारभार चालवला पण ते रामाचे काम म्हणून त्याने सर्व व्यवस्था अगदी चोख ठेवली होती पण स्वतः तपस्वी बनून तो स्वतः अगदी उपभोगशून्य राहिला. शेवटी जेव्हा राम भरताला भेटले तेव्हा वनात गेलेला तपस्वी कोण हे ओळखता आले नसते, इतके पराकोटीचे सामर्थ्य - तपःसामर्थ्य - त्याच्या सर्वांगावर होते. देहाने जरी तो रामापासून दूर होता तरी मनाने क्षणभरही दूर नव्हता. निर्गुणात सगुणभक्ती रचून भरलेली असते ती अशी. तो रामाचा वियोग मानतच नव्हता. त्याने तो वियोग

*Notes*

भक्त्या हि कल्पितं द्वैतमद्वैतादपि सुन्दरम्।

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

www.madhaveeraghuveer.com

फिरवून टाकला. पण त्याची वृत्ती जरी निर्गुण असली तरी त्यालाही थोडासा निर्गुणाचा आधार घ्यावासा वाटला. मनाने तो राममय असला तरी त्याने प्रतीक म्हणून पादुका घेतल्याच. भरत हा कर्तव्यनिष्ठ, तत्त्वनिष्ठ होताच तरीही त्याच्या तत्त्वनिष्ठेला पादुकांच्या आधाराची गरज भासली.

सगुण आणि निर्गुण दोन्ही भक्ती एकमेकांना परस्परपूरक आहेत. सगुणाला निर्गुणात आणि निर्गुणाला सगुणात यावेच लागते.

एखाद्या मित्राला पत्र लिहिणे हे सगुणरूप झाले पण त्याचे सतत स्मरण होत रहाणे हे निर्गुण रूप झाले. प्रत्यक्ष मूर्ति घेऊन पूजा करणे, प्रकट सेवा करणे ही सगुण भक्ती आहे. मात्र आतून सतत जगाच्या कल्याणाचे चिंतन चालू असून बाहेर पूजा न दिसणे ही झाली निर्गुण भक्ती! या दोन्ही सेवा समान किंमतीच्या व योग्यतेच्या आहेत. दोहोंनी एकच ध्येय प्राप्त होते.

तेव्हा सगुण आणि निर्गुण हे केवळ दृष्टीभेद आहेत असे जाणून घेऊन उत्तम भक्ताची लक्षणे अंगी बाणवावी हेच सार! ही उत्तम भक्तलक्षणे रोज सेवन करावीत, मनन करावीत. त्यातील थोडी-थोडी आपल्या आचरणात आणून पुष्टि प्राप्त करून घ्यावीत. आणि अशा तऱ्हेने आपले जीवन हळूहळू परमेश्वराप्रत न्यावे.

Notes राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत हे राष्ट्राचे प्रतीक आहे.

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

रामायणातील उदाहरणावरून लक्ष्मणाने सगुणातर भरताने दूर राहून त्याप्रमाणे निर्गुण भक्ती केली तसेच उदाहरण महाभारतातही आहे. अर्जुन आणि उद्धव हे दोघेही श्रीकृष्णाचे प्रिय शिष्य व सखा होते. दोघेही समान योग्यतेचे होते. श्रीकृष्णाला अत्यंत प्रिय होते. परंतु अर्जुनाने कृष्णाच्या सान्निध्यात राहून, सहवासात राहून सगुण भक्ती केली तर उद्धव मात्र कृष्णापासून दूर राहून सुद्धा मनाने त्याच्या अगदी जवळ होता. प्रत्यक्ष सहवास कमी लाभला तरी त्याच्या उपदेशाप्रमाणेच उद्धवाचे आचरण होते. उद्धवाने निर्गुण भक्ती हा मार्ग अवलंबिला.

भक्ताचा जसा अधिकार, जशी परिस्थिती असेल तसा भगवंत उपदेश करतात. अर्जुनाचे कर्तव्य लक्षात घेऊन त्याला सगुणोपासना सांगितली. क्षत्रिय योद्धा या नात्याने त्याने त्यावेळी युद्ध करणेच आवश्यक होते. त्यामुळे त्याला हातात शस्त्र घेऊन युद्धासाठी सज्ज केले. व भक्तीयोग सांगून उत्तम भक्ताची लक्षणे सांगितली.

भक्तीयोग हा अलौकिक आहे. त्याची ६ वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१. साधन आणि साध्य यांची सरुपता

२. कर्म कर्तव्यकठोर होऊ शकते. ज्ञान तर्ककर्कश ठरु शकते. ध्यानमार्गात देहदंड आहे. अशा प्रत्येक मार्गात काहीतरी त्रुटी आहेच. पण भक्तीयोगात

www.madhavbhaguveer.com

Notes

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

अंत:करणातील ओलावा असतो. या भक्तीयोगात भक्त ईश्वरावरील निर्व्याज प्रेम प्रगट करत असतो. निरपेक्ष वृत्तीने तो परमेश्वराशी समरस होऊन जातो.

३. बाह्य उपाधीची आवश्यकता नाही. कोणतेही ज्ञान नको, पैसा नको, जात पात, रंगरूप नको.

जप तप साधन नेणु नाहि कामाचा ।
स्वरूपता नाहि गोठी ॥

४ या भक्तीयोगात अभावात्मक कल्पना नाही तर सगुण साकार आहे. वेद, शास्त्र, श्रुती त्या ब्रह्माचे वर्णन करताना शिणल्या. ते असे नाही तसे नाही असे नकारात्मक वर्णन (न + इति - नेति) करतात, पण ते नक्की कसे आहे ते त्यांना सांगता येत नाही. मात्र भक्तीयोगाची गंमत त्याच्या वर्णनातच आहे. भक्त आपल्या आराध्य-दैवताचे वर्णन अगदी रंगून जाऊन करतो. त्यामुळे ऐकणाऱ्याच्या दृष्टीसमोर अगदी ते रूप साकार होते. त्या सगुणाला रूप आहे, नाम आहे, वस्त्र-अलंकार आहेत. वाहन आहे, प्रिय गोष्टी आहेत आणि त्यांची कृपा देखील प्रत्यक्ष आहे.

५. सगुणोपासना कुणीही अगदी कुणीही करु शकतो.

तुका म्हणे नाही आम्हासवे काम ।
आम्हा मुक्ती राम नामे हाती ॥

६. भक्तीशिवाय ज्ञान रुक्ष, कोरडे होईल.

७. भक्ती ही मुक्तीहून श्रेष्ठ आहे.

Notes

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeradhuveer.com

कोरडी मुक्ती मला न लगे। एकनाथ महाराज म्हणतात. तर तुकाराम महाराज म्हणतात.

न लगे मुक्ती धन संपदा
संतसंग देई सदा॥

अशी ही भक्ती खूप मधुर, लोभस आहे. सर्व संत या भक्तिरसात भिजून चिंब होतात.

भक्तीला संगीताची जोड आहे.

मृदंगावर सगळ्यांची थाप पडताक्षणीच बोलायला लागते आणि भक्तीने भिजलेला भक्त ईश्वराला आळवायला लागला की त्यातून निर्माण होणारे नादब्रह्म ईश्वरालादेखील डोलायला लावते.

या सर्व वर्णनावरून भक्तीमार्ग इतर मार्गाहून श्रेष्ठ आहे असे वाटेल मात्र तसे नाही. परंतु भक्तिमार्गात जी गोडी आहे ती इतर मार्गात नाही.

भक्तिमार्गाची सुरुवात श्रवणाने होते. समाजातील उपेक्षित घटक - न्हावी, माळी, कुंभार यांना तर आपल्या व्यवसायातच पांडुरंग भेटला. आपला उद्योग चोख करता करता त्यांना ईश्वराचे दर्शन घडले.

सगुणरूप हे त्या निर्गुणाचे प्रतीकात्मक रूप आहे. शेरभर साखरेत जी गोडी आहे तीच गोडी चमचाभर साखरेत सुद्धा आहे. भक्ती नसेल तर ज्ञानाला अहंकार येईल आणि कर्म उद्धट होईल. भक्तीमुळे सर्व मार्गांचा समतोल साधला जातो आणि या मार्गाची गोडी वाढत जाते. असा आहे हा भक्तीचा महिमा!

Notes

SUNDAY 26

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

या अध्यायात भक्तीयोगाचा कळस आहे. तत् पदाचा समारोप आहे. हा अध्याय म्हणजे अमृतधारा आहे. यात अर्जुनाचा एकच प्रश्न आहे. आणि पुढे १९ श्लोक भगवंतांचे मधुर वचन आहे इतकेच नव्हे तर १३ व्या अध्यायाचे ३४ श्लोक. आणि १४ व्या अध्यायाचे २० श्लोक केवळ भगवंत बोलत आहेत. असे हे ७३ श्लोक अखंडपणे भगवंताच्या मुखातून अमृत झरत असल्याप्रमाणे आहे. अमृताची तीन वैशिष्ट्ये असतात.

१. अखंडता २. मधुरता ३. संजीवक

या ७३ श्लोकांना ही तीनही वैशिष्ट्ये लागू पडतात. मध्ये कोणताही खंड नाही. भगवंतांची वाणी अत्यंत मधुर तर आहेच पण ती चैतन्यदायी, नवजीवन देणारी संजीवक आहे.

अकराव्या अध्यायात भगवंतांनी विश्वरूप दर्शन घडवले. आपले भरजरी वस्त्र उलगडून दाखवले. त्याच वस्त्राची सगुणरूप लहानशी घडी घालून आहेत. मागच्या अध्यायातील शेवटचे दोन श्लोक या अध्यायाचे बीजस्वरूप आहेत. त्यात त्यांनी अनन्यभक्तीची थोरवी सांगितली आहे. त्याच अनुषंगाने अर्जुन प्रश्न विचारतो आहे. आणि त्या अध्यायाचा मागचा संदर्भ घेऊन शब्द वापरला आहे - एवम्।

*Notes*

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

1 January 2013

# Happy New Year

(१) अशा प्रकारे जे भक्त तुझ्याशी सतत जोडलेले असतात, तुझ्या जवळ राहून तुझी उपासना करतात आणि जे दुसऱ्या प्रकारचे भक्त त्या अविनाशी, अव्यक्ताची उपासना करतात, अशा दोन प्रकारच्या भक्तांमध्ये उत्तम तत्ववेत्ते कोण? आणि तुला प्रिय कोण?

(२) अर्जुन हा विचक्षण श्रोता आहे. अर्जुनाच्या या प्रश्नातून त्याची जिज्ञासा दिसून येते. त्याच्या प्रश्नाने भगवंत संतुष्ट होतात आणि सगुणोपासना गोड व सोपी आहे असे सांगतात. श्रद्धेने माझी भक्ती करणारे माझ्यात प्रवेश करणारे भक्त मला निश्चित प्रिय आहेत.

(३) सगुणोपासनेची भलावण करताना निर्गुणाचे महत्त्वही भगवंत सांगतात. निर्गुणाची उपासनाही वाया जात नाही. उलट ती आणखी वरची पायरी आहे. या श्लोकात ब्रह्माची ८ विशेषणे (५+३) सांगितली आहेत. त्यापैकी ५ नकारार्थी व ३ विधानार्थी आहेत. ते ब्रह्म अक्षर, अनिर्देश्य, अव्यक्त, अचिंत्य, अचल आहे. शिवाय ते सर्वत्रगम, कूटस्थ आणि ध्रुव आहे. त्या ब्रह्माची उपासना कशी करायची? तर उपासकाचा देह हे देवालय आहे. जीव आणि शिव एकरूपच आहेत. अज्ञानाचे निर्माल्य काढून टाकायचे. सोऽहम हा भाव मनी जागवायचा. म्हणजे ज्ञान प्राप्त होईल. अद्वैताची प्रचीती येईल. मन हे संपूर्णपणे विषयरहित होईल. त्यातून ध्यान साधेल.

Notes

कूटस्थ = अविकारी ऐरण | अधिष्ठान नसल्यास नाही।

मध्यस्थपणे प्रकृति- सूत्रे सत्तारूपे |

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

# 29 JUNE 2011

WEDNESDAY

180 - 185 • Wk - 26

*Leilat al-Meiraj (The Prophet's Ascension) (AE)*

8.00 मनोमलाचा त्याग करणे हे स्नान आहे. आणि इंद्रियनिग्रह ही शुचिता आहे. अशी पूजा बांधावी.

9.00 (४) ही पूजा करण्याचा अधिकार कोणाला?

10.00 अ– सर्व इंद्रियांना संयत करणारा

ब – समबुद्धी समदर्शी पंडित

11.00 क – सर्वभूतहिते रताः – जीवमात्राचे कल्याण करणारा सगुणोपासक युक्ततम असतात तसे निर्गुणोपासकही

12.00 असतात.

1.00 (५) दोन्ही प्रकारच्या उपासकांना लाभणारे अंतिम फळ सारखेच असते. परंतु देहाभिमान्यांकडून अव्यक्ताची

2.00 गती दुःखपूर्वक प्राप्त केली जाते. ती कष्टसाध्य असते. आसक्तचित्त पुरुषांना निर्गुण उपासना करताना

3.00 अतीव क्लेश होतात.

4.00 (६)(७) सर्व कर्मे ईश्वराला अर्पण करायची म्हणजे कर्मे तर करायची, उत्कृष्ट करायची, त्याचे फळ

5.00 घ्यायचे नाही. ते त्याला अर्पण करायचे. ईथे अनन्यता महत्त्वाची आहे. ९व्या अध्यायाच्या शेवटी सांगितले

6.00 आहे. मन्मना, मद्भक्त, मद्याजी, मां नमस्कुरु. एकाच्या सिद्धिने सर्व काही साधले जाते. त्रिविध

7.00 तापाचे चटके बसत असताना तो समत्वयोग आचरणात आणायला शिकवतो त्यातून सहनशक्ती वाढते.

*Notes*

परोपकाराय फलन्ति वृक्षाः परोपकाराय दुहन्ति गावः।
परोपकाराय वहन्ति नद्यः परोपकाराय सतां विभूतयः॥

| 2011 | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUN | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

www.madhaveeraghuveer.com

आणि अशा माझ्यामध्ये मन व बुद्धी समर्पण करणाऱ्या, माझ्यामध्ये प्रवेश करणाऱ्या माझ्या भक्तांचा मी तत्काळ उद्धार करतो. त्यांना या संसारसागरातून तारून नेतो. मी त्यांना काळाच्या आणि देवाच्याही पलीकडे घेऊन जातो.

(८) अर्जुनाचे निमित्त करून भगवंत मन बुद्धीला जिंकायला सांगतात त्यातून चित्त शुद्ध होते. अहंकार सात्विकतेकडे झुकतो
मन → विकार, बुद्धि - विचार, मोक्ष - उद्धार
एकदा विकार आणि विचार जिंकले की पुढचा मार्ग सुकर आहे. मोक्ष, उद्धार, समाधिस्थिती निश्चित आहे.

(९) मन व बुद्धि यावर नियंत्रण मिळवा असे भगवंत सांगतात. परंतु ते प्रत्यक्षात आणणे कठिण आहे. ते जर शक्य नसेल तर अभ्यासयोग साधायला सांगत आहेत. अभ्यास आणि वैराग्य यातून मला प्राप्त करणे शक्य आहे असे भगवंत समजून देतात.
राजयोग। ध्यानयोग खूप अवघड आहे. पण तुम्ही सोपा मार्ग निवडू शकता.

(१०) आणखी सोपा मार्ग भगवंत सुचवतात किती वत्सल, प्रेमळ रूप आहे हे! भगवंत म्हणतात. अभ्यास करणे सुद्धा कठीण वाटत असेल तर इतकेच कर की सर्व कर्मे ईश्वरप्रीत्यर्थ कर. तुला त्या भगवंताचा ध्यास लागू दे

Notes

नामयाचा स्वामी आसनीशयनी दूरी न वसे डोळ्यांपासुनि।
विठ्ठल हा ध्यानी विठ्ठल हा मनी विठ्ठल चिंतनी रात्रंदिवस।
पहावा हा नयनी ऐकावा हा श्रवणी अवघा ध्यावा ध्यानी अवघा मनी
रिकामा मी नसे चिंतनाविण निमिष पद्मनाभ वास हृदयी भोगी॥

| F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | JUL |

तुझे स्वरूपी माझे असो अनुसंधान वरी प्रेमजीवन देई देवा॥

www.madhaveeraghuveer.com

૩૩. યજ્ઞાર્થાત્કર્મણોઽન્યત્ર લોકોઽયં કર્મબન્ધનઃ
સર્વ કર્મે યજ્ઞકાર્ય સમજૂન કરાવીત.
યજ્ઞસ્વરૂપ હે જીવન હોતા | કળેલ ગીતા - - -

प्रपत्ति म्हणजे अनुकूलाच्या / श्रेयसाचा संपर्क आणि प्रतिकूलाच्या / प्रेयसाचा त्याग.

याप्रमाणे ९व्या श्लोकात अभ्यासयोग, १० व्या श्लोकात कर्मसमर्पण तर ११ व्या श्लोकात कर्मफल-त्याग सांगत आहेत.

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।

(११) कर्मफलत्याग - सर्व कर्मे मला समर्पण करणे जर शक्य नसेल तर सर्व कर्मफलाचा पूर्ण त्याग भक्ताने करावा. पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे आपल्या पतिखेरीज कोणाचाही विचार करत नाही त्याप्रमाणे भक्ताने कर्माची फळे केवळ ईश्वरालाच अर्पण करावीत.

शुद्ध भक्ती करणारा भक्त प्रयत्नशील राहून उत्तम कर्म करतो आणि त्याचे फळ मात्र ईश्वराला अर्पण करतो. स्वतः साठी फळाची इच्छा करत नाही.

(असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः।)

(१२) या श्लोकाचा अर्थ दोन प्रकारे होऊ शकतो. यातील पदांची पंचमी विभक्ती वापरली आहे. त्याचा अर्थ त्यापेक्षा किंवा त्याहून असा घेता येईल. श्रेय याचा अर्थ श्रेष्ठ असा आहे. अभ्यासाहून परोक्षज्ञान श्रेष्ठ, ज्ञानाहून ध्यान, ध्यानाहून कर्मफलत्याग श्रेष्ठ आणि त्यागाने परम शांती मिळते. किंवा दुसरा अर्थ अभ्यासातून ज्ञान मिळते. ज्ञानातून ध्यान साधते. ध्यानातून कर्मफलाचा त्याग घडतो. त्यागातून शांती लाभते. निर्गुणाची उपासना करताना विवेक आवश्यक आहे - नेति नेति। तर सगुणाची उपासना

Notes करताना मध्यममार्ग आवश्यक आहे. इति इति।

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

हा श्रेष्ठ क्रम पायऱ्या सूचित करतो. अभ्यासातून ज्ञान, ज्ञानातून ध्यान, ध्यानातून फलत्याग, आणि त्यागातून शांती म्हणजेच मोक्ष मिळतो.

असे भक्तियोगाचे प्रासादिक विवेचन करून भगवंत १३ व्या श्लोकापासून उत्तम भक्त कसा असावा त्याचे वर्णन करत आहेत. उत्तम भक्ताची ३८ लक्षणे भगवंतांनी सांगितली आहेत.

१. अद्वेष्टा - दोषदृष्टीचा अभाव असणे. कोणत्याही वस्तूत, पदार्थात, व्यक्तीत अशा लोकांना दोष दिसत नाही. उलट प्रकर्षाने गुणच जाणवतात. युधिष्ठिर हा अद्वेष्टा या गुणाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्याला अयोग्य किंवा वाईट माणूस सापडलाच नाही.

अमन्त्रमक्षरो नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यो पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥
अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥

२. मैत्र - निस्वार्थ मैत्री हीच खरी मैत्री. पं. रघुनाथ - न्यायशास्त्राचा ग्रंथ व चैतन्य महाप्रभू - निमाई

ददाति प्रतिगृह्णाति गुह्यमाख्याति पृच्छति ।
भुङ्क्ते भोजयते चैव षड्विधं मित्रलक्षणम् ॥

३. कारुण्य - यांच्या अंतःकरणात कारुण्य ओतप्रोत भरलेले असते. एकनाथ महाराजांना गाढवाची व्याकुळता आतून जाणवली. हरिजन मुलाच्या पायाला लागणारे चटके त्यांनी स्वतः अनुभवले. असे त्यांचे करुणामय हृदय होते.

Notes

दीनांचे दुःख निवारण करणे, अनाथांचे अश्रू पुसणे व विश्वात्मक ईश्वराचे दर्शन घडवणे ते कारुण्य।

SUNDAY 3

लोकसंग्रह व लोककल्याण हा कारुण्याचा आत्मा आहे. तिथे व्यक्तिगत सुखदुःखाला स्थान नाही.

चिखलात अडकलेली गाय - तुकाराम महाराज।



एका घोड्याच्या छकड्यावर स्वारी काढे मरती होती. एका

मोहितकेयं मामके' घातक आहे.

# 4 JULY 2011

MONDAY

185 - 180 • Wk - 27

*Independence Day (US), Heroes' Day (ZM)*

धृतराष्ट्र गांधारीची सेवा करण्यासाठी कुंती वनात
गेली पुत्रांच्या राज्याचा निर्ममतेने त्याग
केला कुंती - दुःखाचे मागणे अनाम भक्त.

8.00 ४. निर्ममता - स्वार्थाचा, सुखाचा विचार न करता
माझे, माझे न करता इतरांच्या कल्याणासाठीच
9.00 केवळ केलेली कृती म्हणजे निर्ममता. स्वार्थाचा
लवलेशही नसणे. हे विश्वचि माझे घर!
10.00 ५. निरहंकारिता - ज्ञानयुक्त निरहंकार असतो. ज्ञानामुळे
दृष्टी व्यापक होते. सायुज्यता मुक्ती.
11.00 ६. समदुःखसुखः - यांच्यासाठी सुख व दुःख दोन्ही
समानच असते. हे सुखाने हुरळून जात नाही किंवा
12.00 दुःखाने होरपळून जात नाहीत. गावात जेव्हा प्लेगची
साथ आली तेव्हा लो. टिळकांचा मुलगा मृत्युमुखी
1.00 पडला पण तरीही शोक न करता ते म्हणाले —
सबंध गावाची होळी पेटल्यावर घराघरातून (एखादी)
2.00 गोवरी जाणारच.
गुरु गोविंदसिंग आणि त्यांची पत्नी गुजरी
3.00 यांच्या बाबतीतही अशीच कथा सांगतात.
औरंगजेबाबरोबर झालेल्या लढाईत यांची दोन
4.00 मोठी मुले ~~[illegible]~~ अजितसिंग आणि झुजारसिंग हे
वीरगतीला प्राप्त झाले. गुरु गोविंदसिंगांना खूप
5.00 हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी त्यांनी
स्वाभिमान सोडला नाही. इकडे त्यांची पत्नी व
6.00 दोन लहान मुले यांनी धर्मांतर नाकारले म्हणून पत्नी
गुजरीच्या समोर दोन लहान मुलांना भिंतीत चिणून
7.00 मारले. अशा रीतीने चारही मुले मृत्यु पावल्यामुळे
गुजरीला अनानात दुःख झाले. मात्र गुरु गोविंद सिंग

*Notes*

रावणको मैंने नहीं मारा। रावणको 'मैं'ने मारा।
शिवधनुष्य छातीवर घेऊन पडला.
अज्ञानजन्य — व्यक्तिगत — व्यापक — सामंजस्य निरहंकार

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhavaeeraghuveer.com

एकत्वाचा अनुभव घेतलेला सुखदुःखाच्या पलीकडे जातो.



न प्रहृष्येत् प्रियं प्राप्य
दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः



धैर्याचा मूर्तिमंत पुतळा होते. हे समोर दिसणारे सर्व शीख शिष्य म्हणजे तुझीच मुले आहेत असे तेजस्वी उत्तर त्यांनी दिले. आणि गुजरीनेही खरोखरच त्या सर्वांना आपली मुले मानली.

एकनाथ महाराजही म्हणतात.

सुखदुःख समान सकळ। अवघा प्रेमाचा कल्लोळ॥

किंवा उपनिषदेही म्हणतात –

तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः॥

एकत्वाचा अनुभव घेतलेला सुखदुःखाच्या अतीत होतो

७. क्षमी – अद्वैतानुभव घेतलेला महात्माच क्षमी असतो. तुकाराम महाराजांना मंबाजीने काटेरी झुडुपाने मारले. तर त्या महापुरुषाने त्याला विचारले की मला मारून आपले हात दुखले का?

ज्यावेळी समाजाने ज्ञानोबांना बहिष्कृत केले तेव्हा ते दुःखाने रडले नाहीत आणि ज्यावेळी समाजाने त्यांना शिरोधार्य करून नाचवले तेव्हा ते हर्षभरित झाले नाहीत. त्यांनी सबंध समाजाला क्षमा केली.

एकनाथ, रामदास, पुरंदरदास, कनकदास या सर्व संतांनी समाजाचे टक्के सहन केले पण तरीही ते क्षमाशीलच राहिले. क्षमेने शत्रूला जिंकता येते.

८. संतुष्ट – वरील सात सद्गुण धारण करणारा भक्त आपोआपच संतुष्ट होतो. अंतःकरणात एकदा संतुष्टता दाटली की मग बाह्य उपचाराची गरजच भासत नाही. मात्र अंतःकरणात संतोष नसेल तर बाहेरून कितीही धन

Notes

जीवन सुखदुःखाची जाळी
त्यात अडकला मानव कोळी
एकाने दुसऱ्यास गिळावे
हाच जगाचा न्याय खरा
हीच जगाची परंपरा॥

सदा संतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः।
शर्कराकण्टकादिभ्यो यथोपानत्पदः शिवम्॥

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

मिळाले तरी त्याचा उपयोग नसतो. स्विस बँकेत पैसे ठेवायचे, ते गुप्त ठेवायचे, त्याचा उपभोग घ्यायचा नाही, उलट ते कोणाला कळेल का याची भीती बाळगायची अशा पैशाचा काय उपयोग!

शिवाजी महाराजांनी तुकारामांना मोठमोठे नजराणे, संपत्ती, वस्त्र-अलंकार पाठवले पण तुकाराम महाराजांनी ते सर्व नाकारले आणि म्हणाले -

तुमचे येर वित्त धन । ते मज मृत्तिकेसमान ॥
आम्ही येणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ॥

इतकेच नाही तर त्यांनी शिवाजीमहाराजांना त्यांचे चित्त व मन समर्थचरणावर जडवण्यास सांगितले. कारण त्यांनी समर्थांची थोरवी जाणली होती. समर्थांचे कार्य हे अधिक लोकाभिमुख व राजसत्ता बळकट करण्यासाठी पराक्रम जागवणारे होते. या प्रसंगातून तुकोबांची निःस्पृहता, शिवाजीमहाराजांविषयी प्रेम आणि समर्थांविषयीचा आदर व जिव्हाळा दिसून येतो.

एकदा संतोष अंगी बाणला की सहजच निःस्पृहता येते.

८. योगी - आत्मा व परमात्म्याचे ऐक्य. या श्लोकात सतत हे देहलीदीप या न्यायाने घ्यायचे. ते योगी आणि संतुष्ट या शब्दांनाही लागू पडते.

योगी हा सदैव संतोषयुक्तच असतो.

गोधन गजधन वाजिधन और रतन धन खान ।
जब आवे संतोष धन सब धन धूरि समान ॥

१६. तितिक्षा - ज्याने मन, बुध्दी, इंद्रिये, शरीर या तनांना विजुगुप्सते - - -

Notes.

कल्याणस्वामी - गड चोरवले.
बाबा आमटे - कुष्ठरोग्यांसाठी झटले

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सर्वांवर पूर्ण विजय मिळवून आत्म्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला त्याला यतात्मा असे म्हणतात.

११. दृढनिश्चय - अद्वैताचा अनुभव आला की संशय विरतो. जोपर्यंत एकात्मतेचा अनुभव येत नाही तोपर्यंत दृढनिश्चय होत नाही. विमल ज्ञानाची आत्मानुभूती म्हणजे निश्चयाचे समाधान! पारमार्थिक वाटचालीसाठी संशयनिवृत्ती व पर्यायाने दृढनिश्चय आवश्यक असतो. मी देह नसून आत्मस्वरूप आहे असा ज्याचा ठाम निश्चय झाला. |स्थितोऽस्मि गतसन्देहः|

१२. ईश्वरार्पित मनोबुद्धी - आत्मानुभवी महात्म्याला केवळ परमात्म्याचीच सत्ता अनुभवाला येते. असा भक्तोत्तम आपले मन आणि बुद्धी भगवंतालाच समर्पित करतो. मन हे चित्ताचे अधिष्ठान आहे. मन समर्पण झाले की आपोआपच चित्त व चित्ताच्या वृत्ती ईश्वरमय होतात. बुद्धीचे अधिष्ठान अहंकार आहे. बुद्धीचे ईश्वरार्पण झाली की अहंकार मावळतो. मन-विकार | बुद्धी-विचार

१३. लोकांकडून अनुद्वेग - लोक त्याचा कंटाळा करत नाहीत

१४. लोकांविषयी अनुद्वेग - जो लोकांना कंटाळत नाही.

समुद्राच्या खवळण्याने त्यात राहणाऱ्या प्राण्यांना भय निर्माण होत नाही किंवा समुद्र जलचरांना कंटाळत नाही. शरीर हे अवयवांना कंटाळत नाही त्याप्रमाणे आपण सर्वांचा जीव आहोत अशी त्याची आत्मैक्यबुद्धी असल्याने तो कोणकाही कंटाळत नाही. खरा भक्तोत्तम त्रिगुणातीत असल्याने द्वंद्वातीत असतो.

Notes



www.madhaveeraghuveer.com

8.00 असे महात्मे लोकसंग्रह करताना कंटाळत नाहीत
व लोकांनाही त्यांचा कंटाळा येत नाही. लो. टिळक,
9.00 स्वामी विवेकानंद, रामकृष्ण परमहंस हे सर्व या
लक्षणांनी युक्त आहेत. लोकसंग्रहापोटी स्वतःला
10.00 कितीही कष्ट झाले तरी त्यांना त्याचे काही वाटत
नाही. लोकांच्या सतत भेटण्यामुळे कधी कधी त्यांना
11.00 काही खाताही येत नाही. उपास घडला तरी ते त्रास
सहन करतात. कर्मयोगी माणसाला जनताजनार्दनाची
12.00 पूजा बांधावी लागते.

लो. टिळक पुसदला आले होते. तिथे उभारलेल्या
1.00 मंडपात टिळकांचे व्याख्यान ठरले होते. पण अनेकांना
तिथे प्रवेश मिळाला नाही. त्यांना शब्दही कानावर
2.00 पडला नाही. तेव्हा लोकांसाठी टिळकांनी भर दुपारी
तापलेल्या वाळवंटात उन्हात उभे राहून अंगातून
3.00 घामाच्या धारा वाहत असताना तितकेच प्रभावी
व्याख्यान दिले व लोकांची इच्छा पूर्ण केली. यावेळी
4.00 टिळकांची प्रकृती ठीक नव्हती. पण लोकांची
निराशा करणे त्यांना मानवणारे नव्हते. जनता
5.00 जनार्दन हाच त्यांच्या लेखी देव होता.

१५ हर्षरहितता १६ अमर्षरहितता - सामान्य माणसाचे
6.00 आनंद व मत्सर हे इंद्रियाधिष्ठित असतात. सुखाच्या
प्राप्तीने हर्ष होतो आणि सुख प्राप्त झाले नाही तर अमर्ष
7.00 म्हणजे क्षोभ निर्माण होतो. याउलट ज्याला वासुदेवः सर्वम्
असा अनुभव येतो तो हर्षामर्षाच्या अतीत असतो.

*Notes*

सदा आर्जवी प्रिय जो सर्वलोकी जो आवडतो सर्वाला तोचि-----
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।
न बोले कदा मिथ्यवाचा त्रिवाचा।
जगी धन्य तो दास सर्वांजनाचा।।

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

१७. भयरहितता - माणसाची सारी धडपड इष्टाची प्राप्ती आणि अनिष्टाची निवृत्ती यासाठी असते. परंतु व्यवहारात नेहमी असेच घडेल असे नाही. त्यामुळे विपरीत घडेल की काय अशी जी चित्ताची कातरता तिला भीती वा भय असे म्हणतात. असे भय आंतरिक वा बाह्य असू शकते. प्रत्येक वस्तुला दुसरी कोणतीतरी वस्तु मर्यादा घालत असते. हरिणाला वाघाची भीती, वाघाला शिकाऱ्याची भीती, शिकाऱ्याला नाग, सापाची भीती ही असते. मात्र भक्तोत्तमाला कशाचीच भीती नसते.

भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालात् भयम् ।
मौने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे जराया भयम् ।
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतान्तात् भयम्
सर्वं वस्तु भयान्वितं खलु नृणां वैराग्यमेवाभयम् ॥

१८. उद्वेगरहितता - उद्वेग म्हणजे उद्विग्नता, कातरता, काळजी चंचलता. मात्र ज्याच्यापाशी दृढनिश्चय [illegible] स्वरूपाचे समाधान असते त्याच्या ठायी उद्वेग नसतो. उणीवेतून उद्वेग येतो. नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीमुळे उद्वेग येतो. पण जो यापासून मुक्त तो भगवंताला प्रिय.

१९. निरपेक्षता - अनीहा, कामसंकल्पवर्जिता: ।
माणसाला जे आणि जेवढे मिळते त्यापेक्षा अधिक हवे असते. त्याला आसक्ती असते. मात्र ज्याला सर्व ईश्वरमय झालेले असते तो कशाची इच्छा करणार? त्याला अजून काही मिळवायचे शिल्लकच रहात नाही. भागवतातही संतांची लक्षणे सांगताना १३ वे लक्षण अनीहा हे आहे.

Notes

SUNDAY 10

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

www.madhaveeradhuveer.com

अनिहेमुळे अंतःकरणात इच्छेचा गंधही उद्भवत नाही. त्यामुळे मनुष्य कर्मामध्ये बांधला जात नाही. त्याची निरिच्छता अंतरातून उमलून आलेली असते.

अनपेक्ष होणे म्हणजे तिन्ही प्रकारच्या एषणा जिंकणे. लोकैषणा, वित्तैषणा, दारैषणा.

२०. शुचिता - पवित्रता, शुध्दता हे उत्तम भक्ताचे लक्षण आहे. अंतर्बाह्य शुचिता हवी. चांगले विचार, उच्चार व आचार यांची एकरूपता म्हणजे सदाचार होय.

सामान्यतः पापक्षालनासाठी माणसे तीर्थक्षेत्री जातात. पवित्र जलात स्नान करतात. त्रिविध तापातून मुक्त होतात. पण संतांची गोष्टच वेगळी आहे. पवित्र अशी तीर्थेच संतांच्या चरणांचे तीर्थ मागतात.

काय सांगू त्यांची भाविकांनी तीर्थे मागती चरणतीर्थ ।
काही अंतर न ठेविता । इतरांची कथा कायसी ॥

असे एकनाथ महाराज म्हणतात. तर समर्थ रामदासस्वामी सद्गुरूची १० लक्षणे सांगताना म्हणतात.

निरोध स्वभावे निर्मळ ।

२१. दक्षता - शंकराचार्यांनी दक्ष याचा अर्थ चतुर असा केला आहे. कार्याकार्य, कर्तव्याकर्तव्य याचा नीरक्षीरविवेक म्हणजे दक्षता. प्रपंचात अनेक वेळा मनुष्य किंकर्तव्यमूढ होतो. योग्य निर्णय घेता येत नाही. मात्र अशा प्रसंगी जो भांबावून जात नाही तो दक्ष. हे करावे की ते करावे अशी हॅम्लेटसारखी त्याची अवस्था होत नाही. तो ठाम आणि योग्य निर्णय घेतो.

Notes

[illegible]

Neutral

२२. उदासीनता - म्हणजे नैराश्य नव्हे. उदासीनता म्हणजे अलिप्तता. आकाश जसे सर्वव्यापक असून कोणातही मिसळत नाही. त्याला कशाचा लेप लागत नाही. तो उदासीन असतो. उत् + आसीन अर्थात ज्याची बैठक उंच आहे. डावे उजवे न करणारा निःपक्षपाती असा जो असतो तो उदासीन! उदासीन होणं म्हणजे एका अर्थाने कर्मयोग (निष्काम) आचरणे होय.
२३. गतव्यथः - म्हणजे दुःखापासून मुक्त.
जो सर्व द्वंद्वांच्या अतीत होतो तोच रागद्वेषातून सुटतो. नश्वर देहाची आसक्ती सर्वनाशच असते. पण नश्वर देहाला तुच्छ समजून ज्यांनी देशसेवा व देवसेवा केली ते धन्य महात्मे उदासीन व गतव्यथः असतात.
जो व्यापक बैठकीवरून कार्य करतो त्याला व्यक्तिगत दुःखाचे चटके लागत नाहीत.
स्वा. सावरकर हे अशा वैयक्तिक दुःखापासून मुक्त होते
२४. सर्वारंभपरित्याग - इहलोक आणि परलोक यातील सर्व सुखोपभोग आपल्याला मिळावेत अशी कामना चित्तात धरून जे कर्म आचरतात अशा कामनायुक्त कर्मांचेच नाव सर्वारंभ आहे. मात्र कोणत्याही फळाची इच्छा न धरता जो कर्मरत असतो तोच सर्वारंभपरित्यागी होय. तो फलप्राप्तिसाठी कोणतीही कर्म करत नाही.
२५. न हृष्यति - हर्षरहितता - एकदा सर्वोच्च सुख प्राप्त झाले की आपोआपच दुय्यम वा कनिष्ठ दर्जाचे जे जे सुख असते ते तो त्यागतो.

Notes

कुंती - युधिष्ठिर संवाद

[illegible]

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

२६. न द्वेष्टि · अद्वेषता · इष्ट-अनिष्ट हे प्रकृतीचे द्वंद्व आहे. भक्तोत्तम या द्वंद्वाच्या अतीत असतो. आपणच विश्व आहोत हा विश्वास त्याच्या ठायी असल्यामुळे त्याचा भेदभाव अनायासेच नाहीसा झालेला असतो. म्हणून त्याच्या ठिकाणी द्वेषबुद्धी नसते.

२७. अशोक - तो शोक करत नाही. मनुष्य प्रतिकूल घडले की व्याकुळ होतो. पराकोटीचा शोक करतो. शिवाजी महाराज हे निर्द्वंद्वावस्थेचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांनी काही वेळा देदीप्यमान विजय मिळवले. तर काही वेळा रक्त शिंपून निर्माण केलेल्या स्वराज्याचा मोठा भाग शत्रूला द्यावा लागला. मृत्यूच्या आसवरून कधी चालावे लागले. पण या महात्म्याने कधीही शोक केला नाही. तो स्थितप्रज्ञाप्रमाणे वावरला.

२८. अनाकांक्षा - तो कसलीच कामना करत नाही. तो त्याचे कर्तव्यकर्म चोखपणे करतो मात्र त्यात त्याची कोणतीही कामना नसते.

२९. शुभाशुभपरित्यागी - जी कर्मे शास्त्राधिष्ठित किंवा धर्माधिष्ठित असतात, ती शुभच असतात. अर्थात नित्य व नैमित्तिक कर्मे शुभच असतात. नीतिमत्तेच्या चौकटीत आचरलेले प्रत्येक कर्म शुभच असते. उलट निषिद्ध कर्मे अशुभच असतात. शुभ कर्माच्या आचरणात सज्जनाला अनुराग असतो आणि अशुभ कर्माला द्वेष असतो. हे अनुराग आणि द्वेष जो टाकतो तो केवळ लोकसंग्रहासाठीच कामे करतो. तो चंदनाप्रमाणे झिजतो

Notes

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

No anger inside means
No enemy outside....

पु.क.- [illegible]

30. शत्रू व मित्र याविषयी समभाव - व्यक्तिगत हेवेदावे नष्ट होतात. अर्जुनाने शत्रूंना रणांगणात मारले ते गीतेचा बोध झाल्यावर केवळ कर्तव्यबुद्धीने. त्यात वैयक्तिक राग द्वेष नव्हता. आपले जीवन धर्माधिष्ठित झाले की प्रत्येक कृतीला निष्कामतेचा सुगंध येतो. म्हणून कौरवांचा पाडाव झाल्यानंतरही अर्जुनाचे धृतराष्ट्राशी संबंध सौजन्यपूर्ण व स्नेहार्द्र होते. मित्र व शत्रू याविषयी समभाव प्रस्थापित होतो.

31. मानापमानात समभाव - वस्तुतः अर्जुन हा सर्वश्रेष्ठ धनुर्धर, वीर योध्दा पण तरीसुध्दा अज्ञातवासात त्याला बृहन्नडा होऊन एक वर्ष रहावे लागले. एका पराक्रमी वीराला 'स्त्री बनून रहाणे' यासारखा दुसरा अपमान नाही. पण तरीही तो स्थिर राहिला.

माणसाचे मानापमान व्यक्तिगत अहंकारावर अधिष्ठित असतात. माणसाचा भाव जितका व्यापक होत जाईल तितका अहंकार कमी होत जातो.

राजसूय यज्ञाच्या वेळी शिशुपालाने भगवान श्रीकृष्णाचा वाटेल तसा अपमान केला तरीही ते स्थिर होते. अहंकार जितका छोटा तितके मानापमानही मोठे आणि अहंकार जर ज्ञानजन्य निरहंकारात पालटला तर मानापमानही विरून जातात.

32 शीत-उष्ण सम- प्रकृतीची द्वंद्वे सहन करणे हा खरा पुरुषार्थ. अनुकूल-प्रतिकूल लाभणे हे सर्व कर्मविपाकावर अवलंबून असते. दोन्हीकडे तटस्थपणे

*Notes*

साधु स्वरूपीच राहे । तेथे संगाचे न साहे ।
म्हणोनि साधु तो न पाहे । मानापमान ॥ ८.८-५१॥

स्वरूपमय अवस्थेत असल्याने साधूला इतरांचा संग सहन होत नाही. देहाचा संसर्गदेखील तिथे नसतो, त्यामुळे तो मानापमान पहात नाही

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

www.madhaveeraghuveer.com

पाहणे, समत्वाने आचरणे हा खरा योग आहे.

सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता।
परो ददातीति कुबुद्धिरेषा।
अहं करोमीति वृथाभिमानः।
स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः॥

म्हणून जे बदलता येत नाही, त्याविषयी उद्वेग करू नये आणि जे बदलता येणे शक्य आहे त्यासाठी सर्वशक्तीनिशी प्रयत्न करावा आणि अशा प्रयत्नातून जे बदलले आहे ते टिकवण्यासाठी तन मन धन अर्पून प्रयत्न करावा.

३३. संगवर्जितः - आसक्तीमुळे संग निर्माण होतो. चित्तातून आसक्ती जाऊन उपासक निष्काम कर्मयोगी झाला की संगही सुटतो. स्थावर - जंगम मालमत्ता हा बाह्य संग. तर अंतःकरण चतुष्टयामुळे निर्माण होणारा तो अंतःसंग. हे दोन्ही संग टाकायचे पण प्रत्यक्षात सर्व व्यवहार आचरत असताना हे संग टाकणार तरी कसे? तर प्रत्येक कर्मामागे शुद्ध भाव ठेवायचा त्यात स्वार्थाचा लवलेश नसेल तर सहजच तो संगवर्जित होईल.

३४. निंदा [illegible] - विद्यमान किंवा अविद्यमान दोषांचे प्रत्यक्ष वर्णन म्हणजे निंदा होय. आणि असलेल्या किंवा नसलेल्या गुणांचे संकीर्तन म्हणजे स्तुती होय. या दोन्हींमुळे साधक आपल्या लक्ष्यापासून ढळण्याची शक्यता असते. दोन्ही बाधकच आहेत.

Notes

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

निंदेने मानसिक संतुलन ढळते. आत्मविश्वास कमी होतो. आणि स्तुतीमुळे अकारण अहंकार परिपुष्ट होतो. ज्याची समदृष्टी अंतिम लक्ष्यावर- म्हणजे आत्मज्ञानावर असते तो या दोन्हींमुळे विचलित होत नाही. तुकाराम महाराज म्हणतात. —

कोणी निंदा किंवा वंदा।
आम्हा स्वहिताचा धंदा॥

३५. मौनी - जो मननशील किंवा संयतवाक् असतो तो मौनी. तो वाणीचा, वाचेचा स्वामी असतो. तो मोजकेच पण हितकर आणि कल्याणाचे बोलतो.

ब्रह्म जाणणारा आत्मज्ञानी अधिक बोलत नाही.

३६. संतुष्ट - धर्माचरणाने जे प्राप्त झाले आहे त्यावर संतुष्ट असणे. ज्याला सत्पथावर चालायचे आहे त्याने संतोष वृत्तीच धारण करावी. ब्राह्मणाने नित्य संतुष्ट असावे. मात्र क्षत्रियाने नेहमी असंतुष्ट असावे. क्षात्रिय प्रजेच्या हितासाठी असंतुष्ट असला पाहिजे धर्माचरणाने आणि धर्माधिष्ठित पराक्रमाने प्राप्त केलेल्या राज्याबद्दल मात्र तो संतुष्ट असला पाहिजे.

३७. अनिकेत - एका ठिकाणी न राहणारा. ज्याचा निवास स्थिर नाही असा. एका गावात यतीने एकच रात्र राहावे. आणि पावसाळ्याचे चार महिने वगळता किमान आठ महिने तरी अनिकेत असावे.

गंगा बहती भली और साधु चलता भला।

आपण सर्वच जण या जगात काही काळच राहणारे म्हणजे अनिकेतच आहोत.

Notes

SUNDAY 17

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

473 957 3284

ZC3AG

३८ स्थितप्रज्ञ - म्हणजे ज्याची बुद्धी स्थिर आहे असा मी ब्रह्म आहे या भावनेने जो सर्व द्वंद्वे शांतपणे पचवतो, तो स्थितप्रज्ञ!

३९ भक्तिमान - वरील सर्व ३८ लक्षणांचा कळस असणारे लक्षण म्हणजे भक्तिमान!

चराचरात ज्याला वासुदेवच प्रत्ययाला येतो तो भक्तिमान. ज्ञानोबा म्हणतात - जो स्वतःच चराचर झाला आहे तो आत्मज्ञानी होय पण त्याला भगवद्भजनाचे श्रेष्ठ पातळीचे प्रेम आहे त्याला भगवंत मस्तकावर धारण करतात तो खरा भक्तिमान आहे. अर्जुनाला, उद्धवाला असे फार थोर स्थान भगवत्कृपेने प्राप्त झाले.

४०. अशा रीतीने १३ ते १९ या श्लोकात भगवंतांनी भक्तोत्तमाची ३८ लक्षणे वर्णन केली आहेत. श्रद्धधाना म्हणजे श्रद्धायुक्त उपासक. आद्य शंकराचार्यांचे शिष्य वार्तिककार श्री. सुरेश्वराचार्य म्हणतात -

ज्यांना आत्मज्ञान झाले त्यांच्या ठिकाणी वरील सर्व ३८ गुण प्रयत्नांशिवाय उदित होतात. पण भक्तिमार्गात वैशिष्ट्य हे की इथे दोन्ही सुखाचे आणि दोन्ही सुखाचे!

*Notes*

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

www.madhaveeraghuveer.com

असाराकडून साराकडे. अनात्मवस्तूकडून आत्मवस्तूकडे



## स्थूल व सूक्ष्म (विचार)

सृष्टी निर्माण करण्यासाठी लागणारी सामग्री —

| महाभूत | गुण | स्वरूप | कार्य |
|---|---|---|---|
| आकाश | शब्द | पोकळी | जागा देणे |
| वायु | स्पर्श, शब्द | चंचलता | हालचाल, वाहणे |
| तेज | रूप, स्पर्श, शब्द | उष्णता | अन्नाचे पचन |
| जल | रस, रूप, स्पर्श, शब्द | द्रवरूपता | भिजवणे |
| पृथ्वी | गंध, रस, रूप, स्पर्श, शब्द | कठिणपणा | आधार देणे. |

स्थूलाकडून सूक्ष्माकडे जाताना एक एक गुण कमी होतो. मात्र त्याचे व्यापकत्व वाढत जाते. आकाश हे सर्वात सूक्ष्म म्हणूनच सर्वात व्यापक आहे.

एका काचेच्या बरणीत दगड भरले तरी लहान खड्यांना जागा उरतेच. त्यानंतर वाळू, रेती, पाणी देखील भरता येते आणि तिथे आकाशही असतेच. आकाशच सर्वांना जागा करून देते.

आकाश निर्माण करता येत नाही. करावे लागत नाही. ते सर्वत्र असतेच. घटाकाश – मठाकाश – चिदाकाश – महदाकाश घटात तर ते असतेच पण त्याच्या छिद्रातही असतेच. शरीरातील पेशीपेशीत, रोमरोमात, रंध्रारंध्रात ते आहेच. ते अतिसूक्ष्म आहे म्हणूनच व्यापक आहे.

आपलाही प्रयत्न स्थूलाकडून सूक्ष्माकडे जायचा असला पाहिजे. जडाकडून तरलतेकडे. व्यक्ताकडून अव्यक्ताकडे. फूल हलके तरी जड। फुलांचे वजन करता येते. परंतु गंध हा त्याहीपेक्षा सूक्ष्म आहे.

आकाश जर इतके तरल आहे तर त्या आकाशाला

Notes कवेत घेणारे ब्रह्म किती तरल किती सूक्ष्म असेल ? तिथपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच अध्यात्ममार्ग.

उभारणी होताना जो क्रम होता त्याच्या विरुद्ध क्रम संहारक्रिया वेळी असणार आहे. अणुरेणुया थोकडा। तुका आकाशाएवढा। ते आकाशापलीकडे गेले.

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | 2011 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | AUG |

जड वस्तू ही अधिक नाशिवंत आहे. म्हणूनच ती लवकर खराब होते. त्याला कीड, बुरशी लागू शकते.
अन्न, धान्य, पदार्थ नासू शकतात. त्यानंतर पाण्याला वास येऊ शकतो. परंतु त्यापुढे तेज, वायु, आकाश हे अधिकाधिक तरल होत जाते.
हर कोई चाहता है एक मुठ्ठी आसमान। म्हणजेच त्याची Space.
सामान्य मनुष्य स्वार्थी असतो म्हणून त्याचे आकाश मर्यादित असते. खिडकीतून दिसणाऱ्या आभाळाच्या तुकड्यावर तो समाधान मानतो. परंतु उंच डोंगरावरून आभाळाकडे पाहताना त्याची विशालता उमगू लागते.
क्षितिज ही आभासी रेषा आहे. आकाश जमिनीला टेकल्यासारखे वाटते परंतु ते काही खरे नाही. आकाश, अवकाश, अंतराळ यांच्यापलीकडे आमच्याकडे शब्द नाहीत परंतु शब्द संपले म्हणून ते काही संपत नाही. ते अनंत कोटि ब्रह्मांडांना व्यापून आहे. आणि त्या आकाशाला कवेत घेणारे ते ब्रह्म तर त्याच्या कितीतरी पटीने सूक्ष्म आहे आणि म्हणूनच व्यापक आहे. त्याला कोठेही अटकाव नाही. त्याचा सर्वत्र संचार आहे. ते ब्रह्म जितके हिमालयात आहे तितकेच मुंगीमध्येही आहे, ते उंच पर्वतशिखरावर आहे. ते सागराच्या तळाशी देखील आहे. ते नाही अशी जागाच नाही. ते सर्वगत आहे. सर्वदेशीय आहे. अपरिच्छिन्न आहे. त्याचे तुकडे करता येत नाही परंतु ते सर्वत्र विभागल्याप्रमाणे वाटते.

Notes
यथा सर्वगतं सौक्ष्म्यात् आकाशं नोपलिप्यते।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

क्षेत्रक्षेत्रज्ञ योग।

तृतीय षडाध्यायीचा प्रारंभ - असि पद
यातून निर्णयात्मक, निश्चयात्मक, जीव ब्रह्मैक्यज्ञान आणि
अखंड बोधात्मक ज्ञान देणे हेच याचे प्रयोजन आहे.
अनेक प्रश्न, शंका, संशय येत असतात.
१. जीव व परब्रह्म यात एकत्व कसे? ब्रह्म काय? आत्मा
काय? अनात्मा काय? संसाराचे स्वरूप? ज्ञान म्हणजे काय?
आत्मा ⟶ पुरुष, क्षेत्रज्ञ, परब्रह्मस्वरूप
अनात्मा ⟶ प्रकृति, क्षेत्र, जीवस्वरूप
द्रष्टा हा दृश्यापासून भिन्न असावा लागतो.
घटद्रष्टा घटात् भिन्नः इति न्यायेन।
मी घटाला जाणत असले तरी मी घट नाही.
द्रष्टा हा Subject आणि दृश्य हे Object आहे.
Subject remains always subject and
Object remains always object.

☆ प्रत्येक Object ही निर्मित वस्तु आहे. त्याला उत्पत्ति आहे
तसेच नाश आहे. उत्पत्तिपूर्वी ती नव्हती म्हणजे प्रागभाव
आणि नाशानंतर त्याचा अभाव आहे. प्रध्वंसाभाव----
प्रत्येक वस्तु देशकालवस्तुपरिच्छिन्न असल्याने तिला रूप
व आकार असतो. Dimention आहे. प्रत्येक निर्मित
वस्तु ही अनित्य, नाशवान, कालबद्ध आहे. एक वस्तु कधीही
दुसरी वस्तु होऊ शकत नाही. ती जड, अचेतन असते. तिला
स्वतःची चेतना नसते अर्थात त्यामुळे जाणीवही नसते.
स्वतःचीही नाही आणि इतरांचीही नाही. कालाच्या ओघात
कितीतरी वस्तु उत्पन्न होतात, बदलतात, नाश पावतात.
Notes या निर्मित वस्तूंमध्ये नानात्व आहे. अनेकत्व आहे.
त्यामुळेच या विश्वात अगणित नामरूपे आहेत.

www.madhavvelaghuveer.com

8.00 माञ द्रष्टा हा Subject आहे. तो चेतनस्वरूप आहे.
I know that I exist. I am aware of myself.
9.00 I am self conscious awareful being.
मला माझ्याव्यतिरिक्त या विश्वाचीही जाणीव आहे.
10.00 मला शब्द, स्पर्श, रूप, रस गंध जाणवतात. सूर्य, चंद्र
नक्षत्र, तारे मला ठाऊक आहे.
11.00 या विश्वातील दृश्य सतत बदलत असते मात्र द्रष्टा
बदलत नाही. तो स्वतः स्वरूपात कायम राहतो. सिनेमा
12.00 पाहणारा, पुस्तक वाचणारा, प्रवास करणारा द्रष्टा एकच
आहे. तो नित्य अविकारी स्वरूपात असतो.
1.00 घटाच्या निर्मितीची, सौंदर्याची, नाशाची जाणीव द्रष्ट्याला
होते. घटनिर्मितीपूर्वी द्रष्टा होताच व घटनाशानंतरही आहेच.
2.00 कारण द्रष्टा हा उत्पत्तिस्थितिलयविरहित आहे. तसेच तो
देशकालवस्तु यांनी परिच्छिन्न नाही. द्रष्टा हा कधीही
3.00 दृश्याच्या कोणत्याही गुणधर्म, विकारांनी कधीही लिप्त,
स्पर्शित, परिणामी, विकारयुक्त होत नाही. तो असंग आहे.
4.00 आणि म्हणूनच या विश्वामध्ये द्रष्टा (Subject) व
दृश्य (Object) या तमः प्रकाशावत् अशा भिन्न २ वस्तू आहेत
5.00 त्यामुळेच मी वेगळा व टेबल वेगळे. मी टेबल नाही.
तसेच मी विश्व ही नाही. परंतु हाच सुविचार जेव्हा
6.00 शरीराच्या बाबतीत करण्याची वेळ येते तेव्हा मात्र चूक होते.
माझे शरीर जर दृश्य असेल तर मी त्यापासून भिन्न
7.00 असायला हवा. परंतु माझे माझे म्हणता म्हणता मी त्या
शरीराशी इतका तादात्म्य पावतो की शरीराच्या रंगरूपाला
Notes वर्तनाला मी माझे समजायला लागतो. उंच बुटका,
गोरा काळा, सुंदर कुरूप, मुका बहिरा, शहाणा - मूर्ख
ब्राह्मण शूद्र। यातून बाहेर पडण्यासाठी हवा तो
आत्मानात्म विवेक। म्हणजेच Subject Object चे
स्पष्ट ज्ञान हवे याला दृक्दृश्य विवेक। क्षेत्रक्षेत्रज्ञयोग म्हणतात.

www.madhaveeraghuveer.com

| 2011 | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| JUL | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |